**'कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन)'** पदावर
दि.०१/०१/२०२४ रोजी काम करणाऱ्या
अधिकाऱ्यांची अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीबाबत..

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी -४११ ०१८**
**क्र.सा.प्र.वि/१२/कावि/ ०७ /२०२५**
**दिनांक : ०७ /०७ /२०२५**

वाचले क्र. १) आदेश क्र.साप्रवि/१२/कावि/९८४/२०२४ दि.१८/१२/२०२४ अन्वये प्रसिध्द केलेली 'कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन)' पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी
२) श्री.कुदळे संतोष यांचे आक्षेप अर्ज
३) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.२५/०९/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव
४) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि.२९/८/२०१३
५) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/७४/२०२१ दि. २८/०१/२०२१
६) सामान्य प्रशासन विभागाकडील दि. ०७ / ०७ /२०२५ चा मान्य प्रस्ताव

**आदेश**

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/०६/२०२१ अन्वये दि.०१/०१/२०२४ रोजी **'कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन)'** या पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरच्या तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी मधील अधिकाऱ्यांचे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, ज्येष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा यादीमध्ये नांव नसलेबाबत हरकती काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

**'कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन)'** पदाची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी संबंधित अधिकाऱ्यांना बजाविलेबाबत सर्व संबंधित शाखाप्रमुखांकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्याने अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील. प्रस्तुत तात्पुरती सेवाज्येष्ठतायादीवर आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

**१) शैक्षणिक अर्हतेबाबत आक्षेप -**

श्री.कुदळे संतोष यांनी वाढीव शैक्षणिक अर्हतेची नोंद घेणेबाबत दाखल केलेले आक्षेप, अर्हतेचे दाखले पाहून आक्षेप मान्य करण्यात आले आहे. तरी उपरोक्त मान्य आक्षेपाची यथार्थ नोंद अंतिम सेवाज्येष्ठतायादी मध्ये घेण्यात येत आहे.

**२) जात प्रवर्गामध्ये बदल करणेबाबत -**

श्री.कुदळे संतोष यांनी तात्पुरत्या सेवाज्येष्ठतामध्ये जात प्रवर्गात भ.ज.(ब) ऐवजी इमाव अशी दुरुस्ती करण्यासाठी आक्षेप अर्ज सादर केलेला आहे. आक्षेप अर्जासोबत उपजिल्हाधिकारी पुणे यांच्याकडील जात-माळी प्रवर्ग-इमाव याप्रमाणे प्रमाणपत्र व सेवानोंद पुस्तकांची छायांकित प्रत पाहून आक्षेप मान्य करण्यात आलेला आहे. तरी उपरोक्त मान्य आक्षेपाची यथार्थ नोंद अंतिम सेवाज्येष्ठतायादी मध्ये घेण्यात येत आहे.

सबब उपरोक्त वाचले क्रमांक ४ व ५ चे प्राप्त अधिकारान्वये **'कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन)'** पदाची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ नुसार अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ही अंतिम सेवाज्येष्ठतायादी मे.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या सेवाज्येष्ठतायादीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रत- संबंधित विभाग

२/-सदर आदेश व सेवाज्येष्ठतायादी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

## कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन) पदाची दि.01/01/2024 रोजीची अंतिम सेवाज्येष्ठतायादी

पे लेवल :- S-15 वेतनश्रेणी :- 41800 - 132300

| अ.क्र. | संगणक क्र. | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन) पदावरील रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नती/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 9643 | कुदळे संतोष पंडित | इतर मागास वर्ग | स्था.अभि.सहा.कोर्स, डी.सी.ई, बी.ई. (सिव्हील), एम.टेक ( ट्रान्सपोर्टेशन इंजीनियरींग), एम.एस.सी.आय.टी. | 15/07/1979 | 11/06/2021 | पदोन्नती | स्था. अभि. सहाय्यक | 26/02/2008 | 31/07/2037 | |

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.